महाराष्ट्र शासन

कामगार विभाग

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ ,मुंबई

## अर्थसंकल्पीय अंदाज
## २०२५-२६
## Budget Estimates
## 2025-26

# अर्थसंकल्पीय अंदाज
# २०२५-२६

## भाग एक-
## महसूल व जमा यांचे तपशीलवार
## अर्थसंकल्पीय अंदाज

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ ,मुंबई

## मंडळाचे सन २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रक

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १८ (१) नुसार मंडळाची स्थापना करणेबाबत तरतूद आहे. राज्य शासनाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन आणि सेवाशर्ती) नियम, २००७ नियमावली तयार केली. शासन अधिसूचनेनुसार सन २००७ मध्ये मंडळाची स्थापना करण्यात आली. दि. १ मे २०११ रोजी त्रिपक्षीय मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. मंडळाचे प्रत्यक्ष कामकाज सन २०११ पासून सुरु करण्यात आले. सन २०१२-१३ पासून मंडळाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक बनविण्यात येत आहे.

२. मंडळाचे अंदाजपत्रक अधिनियमातील कलम २५ च्या तरतुदीनुसार, मंडळाच्या मान्यतेअंती राज्य व केंद्र शासनास माहितीकरीता सादर करण्यात येत आहे.

३. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २७ नूसार मंडळाच्या प्रत्येक वर्षाच्या लेख्यांचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांच्याकडून लेखापरिक्षण करणे अनिवार्य आहे त्यानूसार मंडळाचे सन २००७-०८ ते माहे जानेवारी २०२२ पर्यंतचे लेखापरिक्षण (IR) व सन २००७-०८ ते २०२१-२२ या वर्षाचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांसकडून पुर्ण करण्यात आले आहे.

४. मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांचे लाभ वाटप करण्यासाठी मंडळ व शासन स्तरावरून अनेक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

अ) मंडळाने जुलै २०२० पासून बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाची प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरू केली आहे. ऑनलाईन प्रक्रिया चालू झाल्यामुळे नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाची प्रक्रियेत सुलभता व पारदर्शकता आली आहे.

ब) बांधकाम कामाच्या व्याख्येमध्ये बांधकामाशी संबंधित २१ कामे अंतर्भूत करण्याबाबतची अधिसूचना उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत दि.१८.०८.२०१७ रोजी निर्गमित करण्यात आली. त्यामुळे बांधकामाशी संबंधित सर्व कामावरील बांधकाम कामगारांची नोंदणी करणे शक्य होत आहे.

क) बांधकाम क्षेत्रातील नोंदीत बांधकाम कामगार संघटनाची नोंदणी व लाभ वाटपाकरीता मदत घेण्याचा निर्णय दि. १५.०९.२०१७ रोजी कामगार विभागाने घेतला आहे.

. शासन पत्र उद्योग, ऊर्जा कामगार विभाग दि. ०९.११.२०२२ अन्वये, बांधकाम कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण शुल्काची रक्कम रू १ प्रति नोंदणी अशी सुधारीत करण्यात आली आहे.

**सन २०११-१२ पासून मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांचा वर्षनिहाय तपशील व सन २०२५-२६ मध्ये अपेक्षित नोंदणी संख्या**

| अनु.क्र. | आर्थिक वर्ष | नोंदित जिवीत (सक्रीय) बांधकाम कामगारांची संख्या | नोंदित जिवीत (सक्रीय) बांधकाम कामगारांची प्रगत एकुण संख्या |
|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | ३७५१७ | ३७५१७ |
| २ | २०१२-१३ | ६५९४६ | १०३४६३ |
| ३ | २०१३-१४ | ६२८७८ | १६६३४१ |
| ४ | २०१४-१५ | १७६५७९ | ३४२९२० |
| ५ | २०१५-१६ | १२१२२५ | ४६४१४५ |
| ६ | २०१६-१७ | ९७७४५ | ५६१८९० |
| ७ | २०१७-१८ | ३५५११८ | ९१७००८ |
| ८ | २०१८-१९ | ६६२०८८ | १५७९०९६ |
| ९ | २०१९-२० | ७५५९१२ | २३३५००८ |
| १० | २०२०-२१ | ७९१२० | २४१४१२८ |
| ११ | २०२१-२२ | ८३१४५३ | ३२४५५८१ |
| १२ | २०२२-२३ | १२२६७८९ | ४४७२३७० |
| १३ | २०२३-२४ | १२११८७१ | ५६८४२४१ |
| १४ | २०२४-२५ (चे सुधारित अंदाज) | २७००००० | ८३८४२४१ |
| १५ | **२०२५-२६ (अंदाजित)** | ३०००००० | **११३८४२४१** |

## ५. मंडळाच्या सन २०२५-२६ च्या जमेचे अंदाज

### अ. जमा उपकर

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी उपकर अधिनियम १९९६ च्या कलम ३ (१) नुसार केंद्र शासनाने अधिसूचना क्र. एसओ २८९९, दि.२६.०९.१९९६ अन्वये बांधकामाच्या एकूण मूल्याच्या (जमिनीचे मूल्य वगळून) १% दराने उपकर जमा करण्याचे अधिसूचित केले आहे. केंद्र शासनाच्या सदर अधिसूचनेस अनुसरून उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे परिपत्रक क्र.बीसीए/१२००७/प्र.क्र.७८८/ कार्यासन-७ दि.२१.०४.२००८ अन्वये, निर्गमित सूचनेनुसार दि.०१.०१.२००८ पासून राज्यातील इमारत व इतर बांधकाम नियोक्त्याकडून उपकर जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**उपकर स्वरूपात मंडळाकडे सन २००७-०८ पासून जमा वर्ष निहाय रक्कमेचा तपशील व सन २०२५-२६ च्या उपकर जमेचे अंदाज**

(रूपये कोटीत)

| अनु क्र. | आर्थिक वर्ष | उपकराची प्रत्यक्ष जमा रक्कम | उपकराची प्रगत जमा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २००७-०८ | ०.७७ | ०.७७ |
| २ | २००८-०९ | ०.५८ | १.३५ |
| ३ | २००९-१० | ९.१८ | १०.५३ |
| ४ | २०१०-११ | ८७.५८ | ९८.११ |
| ५ | २०११-१२ | ४२५.२९ | ५२३.४ |
| ६ | २०१२-१३ | ७७७.०९ | १३००.४९ |
| ७ | २०१३-१४ | ७२८.९ | २०२९.३९ |
| ८ | २०१४-१५ | ८३६.५ | २८६५.८९ |
| ९ | २०१५-१६ | ११८०.२१ | ४०४६.१ |
| १० | २०१६-१७ | १०६१.८८ | ५१०७.९८ |
| ११ | २०१७-१८ | ११४५.९९ | ६२५३.९७ |
| १२ | २०१८-१९ | १३६२.३२ | ७६१६.२९ |
| १३ | २०१९-२० | १५११.३४ | ९१२७.६३ |
| १४ | २०२०-२१ | १४६४.७१ | १०५९२.३४ |
| १५ | २०२१-२२ | २३१०.१३ | १२९०२.४७ |
| १६ | २०२२-२३ | २४८४.०१ | १५३८६.४८ |
| १७ | २०२३-२४ | ३१९३.४३ | १८५७९.९१ |
| १८ | २०२४-२५ (चे सुधारित अंदाज) | ३४००.०५ | २१९७९.९६ |
| १९ | **२०२५-२६(अंदाजित)** | **६०००.००** | **२७९७९.९६** |

**ब) बांधकाम कामगार नोंदणी शुल्क**

शासन पत्र उद्योग, ऊर्जा कामगार विभाग दि. ०९.११.२०२२ अन्वये, बांधकाम कामगारांची नोंदणी/ नुतनीकरण शुल्काची रक्कम रू १ प्रति नोंदणी अशी सुधारीत करण्यात आली आहे.

**कामगार नोंदणी फी स्वरूपात सन २०११-१२ पासून मंडळाकडे जमा रक्कमेचा वर्ष निहाय तपशील व सन २०२५-२६ चे अंदाजित जमा**

(रूपये लाखात)

| अनु.क्र. | आर्थिक वर्ष | नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या | प्रत्यक्ष जमा नोंदणी शुल्क | प्रगत जमा नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | ३७५१७ | ८.४५ | ८.४५ |
| २ | २०१२-१३ | ६५९४६ | २०.६ | २९.०५ |
| ३ | २०१३-१४ | ६२८७८ | २०.६७ | ४९.७२ |
| ४ | २०१४-१५ | १७६५७९ | ४३.८९ | ९३.६१ |
| ५ | २०१५-१६ | १२१२२५ | ३०.३१ | १२३.९२ |
| ६ | २०१६-१७ | ९७७४५ | २१.५६ | १४५.४८ |
| ७ | २०१७-१८ | ३५५११८ | ८३.८ | २२९.२८ |
| ८ | २०१८-१९ | ६६२०८८ | १९०.०० | ४१९.२८ |
| ९ | २०१९-२० | ७५५९१२ | १९०.०० | ६०९.२८ |
| १० | २०२०-२१ | ७९१२० | १४०.९६ | ७५०.२४ |
| ११ | २०२१-२२ | ८३१४५३ | २४१.२२ | ९९१.४६ |
| १२ | २०२२-२३ | १२२६७८९ | १६६.११ | ११५७.५७ |
| १३ | २०२३-२४ | १२११८७१ | १४.२५ | ११७१.८२ |
| १४ | २०२४-२५ (चे सुधारित अंदाज) | २७००००० | २५.३३ | ११९७.१५ |
| १५ | **२०२५-२६(अंदाजित)** | ३०००००० | ३०.०० | १२२७.१५ |

**क) नोंदित बांधकाम कामगारांची नुतनीकरण शुल्क**

सन २०११-१२ या वर्षापासून मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येत आहे. सुरुवातीस नोंदित बांधकाम कामगाराकडून प्रति महा रू.५ याप्रमाणे नुतनीकरण शुल्क जमा करण्यात येत होती. उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत दि.१५.०१.२०१८ रोजी निर्गमित अधिसूचनेद्वारे नोंदित बांधकाम कामगाराची नुतनीकरण शुल्क दरमहा रू.०५ ऐवजी रू.०१/- एवढी कमी करण्यात आली आहे. शासन पत्र उद्योग, ऊर्जा कामगार विभाग दि. ०९.११.२०२२ अन्वये,

बांधकाम कामगारांची नुतनीकरण शुल्काची रक्कम रू १ प्रति नुतनीकरण प्रति वर्ष अशी सुधारीत करण्यात आली आहे.

**सन २०११-१२ पासून मंडळाकडे जमा मासिक वर्गणीचा वर्षनिहाय तपशील व सन २०२५-२६ मधील अपेक्षित नुतनीकरण शुल्काची रक्कम.**

(रूपये लाखात)

| अनु.क्र. | आर्थिक वर्ष | नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या | नुतनीकरण वर्गणीची रक्कम | प्रत्यक्ष नुतनीकरण नोंदणी शुल्क |
|---|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | ३७५१७ | २०.२७ | २०.२७ |
| २ | २०१२-१३ | ६५९४६ | ४९.४४ | ६९.७१ |
| ३ | २०१३-१४ | ६२८७८ | ४९.६ | ११९.३१ |
| ४ | २०१४-१५ | १७६५७९ | १०५.३५ | २२४.६६ |
| ५ | २०१५-१६ | १२१२२५ | ७२.७३ | २९७.३९ |
| ६ | २०१६-१७ | ९७७४५ | ५१.७४ | ३४९.१३ |
| ७ | २०१७-१८ | ३५५११८ | १०६ | ४५५.१३ |
| ८ | २०१८-१९ | ६६२०८८ | ४१० | ८६५.१३ |
| ९ | २०१९-२० | ७५५९१२ | ४०३ | १२६८.१३ |
| १० | २०२०-२१ | ९३७४२ | १९.७६ | १२८७.८९ |
| ११ | २०२१-२२ | २५०१९२ | ११९.७७ | १४०७.६६ |
| १२ | २०२२-२३ | २४३२८७ | ७४.७७ | १४८२.४३ |
| १३ | २०२३-२४ | ५४८३०२ | ५.०३ | १४८७.४६ |
|  | २०२४-२५ (चे सुधारित अंदाज) | १२५०००० | १२.५० | १४९९.९६ |
| १४ | **२०२५-२६ (अंदाजित)** | **१५०००००** | **१५.००** | **१५१४.९६** |

## ड) मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीवरील व्याज

मंडळाकडे जमा होणारा उपकर, नोंदणी शुल्क, नोंदित बांधकाम कामगारांच्या मासिक वर्गणी व मंडळाच्या अतिरीक्त निधीच्या गुंतवणूकीवरील व्याजापोटी जमा निधी मधून नोंदीत बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवर खर्च करण्यात येतो व अतिरिक्त निधीच्या गुंतवूणकीबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल रिट पिटिशन नं. W.P. (c) ३१८/२०१६ Contempt Petition No.५२ of २०१३ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०७.०२.२०१२ व दि.०२.०८.२०१७ रोजीच्या आदेशास अनुसरून महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या दि. २२.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मंडळाकडील अतिरीक्त निधीची गुंतवणूक राष्ट्रीयकृत बँकेत

करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशाप्रमाणे मंडळाच्या अतिरीक्त निधीची गुंतवणूक मंडळाने नियुक्त केलेल्या गुंतवणूक उपसमितीच्या मान्यतेने राष्ट्रीयकृत बँकांमध्ये करण्यात येत आहे.

**मंडळाच्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीवर व्याजापोटी प्राप्त रक्कमेचा वर्षनिहाय तपशील व सन २०२५-२६ मधील गुंतवणूकीवरील अपेक्षित व्याज रक्कमेचा तपशील.**

(रुपये कोटीत)

| अनु.क्र. | आर्थिक वर्ष | गुंतवणूक रक्कम | प्राप्त व्याज रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | ३४५ | २१.५७ |
| २ | २०१२-१३ | १३२३.५ | ७६.८७ |
| ३ | २०१३-१४ | २०५१.९८ | १५६.७४ |
| ४ | २०१४-१५ | २५९३.३ | २१७.५४ |
| ५ | २०१५-१६ | ३८९६.३९ | ३४६.३४ |
| ६ | २०१६-१७ | ३०८२.४९ | २६१.५९ |
| ७ | २०१७-१८ | ६५८४.७८ | ३४२.८८ |
| ८ | २०१८-१९ | ८१४०.०० | ६३४.३९ |
| ९ | २०१९-२० | ९०१०.०० | ५७८.३८ |
| १० | २०२०-२१ | ९६००.०० | ४१७.६० |
| ११ | २०२१-२२ | ११३५०.०० | ४४३.४९ |
| १२ | २०२२-२३ | १०८००.०० | ६८३.४१ |
| १३ | २०२३-२४ | ९०५०.०० | ७२२.१५ |
| १४ | २०२४-२५ (चे सुधारित अंदाज) | ७७००.०० | ६१५.२४ |
| १५ | **२०२५-२६(अंदाजित)** | **८५००.००** | **७००.००** |

**इ) अटल आहार योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजनापोटी बांधकाम कामगार हिश्याची जमा रक्कम:-**

शासन पत्र उद्योग, ऊर्जा कामगार विभाग दि. २३.१०.२०२३ अन्वये सदरची योजना दि. ०१.११.२०२३ पासून बंद करण्यात आली आहे.

**ई. मंडळाची इतर जमा**

मंडळाच्या इतर जमा रक्कमेमध्ये माहिती अधिकार कायद्या अंतर्गत प्राप्त होणाऱ्या फी ची रक्कम, मासिक वर्तमानपत्र (रद्दी विक्री), निर्लेखनद्वारे वस्तूची विल्हेवाट व इतर जमा रक्कमेचा समावेश आहे.

**फ. केंद्र शासन व राज्य शासनाकडून अर्थसहाय्य/ अनुदान**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास आजपावेतो केंद्र शासन किंवा राज्य शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अर्थसहाय्य अथवा अनुदान प्राप्त झालेले नाही.

*** मंडळाकडे मागील ३ वर्षातील प्रत्यक्ष जमा, चालू वित्तीय वर्षातील सुधारीत अंदाज व सन २०२५-२६ या वर्षाच्या जमेचे अंदाज ***

(रूपये लाखात)

| अ. क्र. | जमेची बाब | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ (मूळ अंदाज) | २०२४-२५ (सुधारीत अंदाज) | २०२५-२६ (प्रस्तावित जमा) |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. | बांधकाम उपकर | २४८४०१.९७ | ३१९३४३.०० | ३७००००.०० | ३४०००४.६७ | ६०००००.०० |
| ब. | बँकेतील मुदत ठेव व बचत रक्कमे वरील व्याज | ६४३४६.८७ | ७३०९४.२७ | ७७२००.०० | ७३२०२.२८ | ७०८७८.९० |
| क. | बांधकाम कामगार नोंदणी फी | १६६.११ | १४.२५ | १६.०० | २५.३३ | ३०.०० |
| ड. | बांधकाम कामगार नुतनीकरण शुल्क | ७४.७७ | ५.०३ | ५.६० | ११.१० | १५.०० |
| ई. | इतर जमा | १.०० | १.०० | ०.०२ | ०.०२ | ०.०१ |
| | **एकूण** | **३१२९९०.७२** | **३९२४५७.५५** | **४४७२२१.६२** | **४१३२४३.४०** | **६७०९२३.९१** |

# अर्थसंकल्पीय अंदाज
# २०२५-२६

## भाग दोन-
## खर्चाचे तपशीलवार
## अर्थसंकल्पीय अंदाज

## ६. मंडळाच्या सन २०२५-२६ च्या खर्चाचे अंदाज

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे जमा होणारा निधी इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम २४ (२) (३) नुसार मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवर खर्च करण्यात येतो.

### अ) मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च

मंडळामार्फत सद्यस्थितीत ३९ विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली आहे.

- **सन २०११-१२ पासून मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वाटपावर खर्चाचा वर्ष निहाय तपशील**

(रूपये कोटीत)

| अनु.क्र. | आर्थिक वर्ष | लाभ वाटपावरील खर्च | लाभ वाटपावरील प्रगत खर्च |
|---|---|---|---|
| १ | २०११-१२ | ०.००२६ | ० |
| २ | २०१२-१३ | ०.५९ | ०.५९ |
| ३ | २०१३-१४ | ३८.३९ | ३८.९८ |
| ४ | २०१४-१५ | ६०.७५ | ९९.७३ |
| ५ | २०१५-१६ | ३५.३४ | १३५.०७ |
| ६ | २०१६-१७ | १५.२८ | १५०.३५ |
| ७ | २०१७-१८ | ६०.५२ | २१०.८७ |
| ८ | २०१८-१९ | ३७६.०१ | ५८६.८८ |
| ९ | २०१९-२० | १०३४.७६ | १६२१.६४ |
| १० | २०२०-२१ | १४२२.९४ | ३०४४.५८ |
| ११ | २०२१-२२ | १६४५.१० | ४६८९.६८ |
| १२ | २०२२-२३ | ३९२२.५८ | ८६१२.२६ |
| १३ | २०२३-२४ | ४६६५.४९ | १३२७७.७६ |
| १४ | २०२४-२५ (चे सुधारित अंदाज) | ५१४२.५० | १८४४९.१९ |
| १५ | **२०२५-२६(अंदाजित)** | **६६१८.१०** | **२५०६७.२९** |

➢ मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनावरील सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष खर्च, सन २०२४-२५ मधील सुधारित अंदाज व सन २०२५-२६ मधील प्रस्तावित खर्चाचे अंदाज

(अ). विविध कल्याणकारी योजनांवरील अपेक्षित खर्च (रूपये लाखात)

| अ.क्र | लेखा शीर्ष क्र. | विविध कल्याणकारी योजना | सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष खर्च | सन २०२४-२५ मधील सुधारित अंदाज | सन २०२५-२६ मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| E | | **शैक्षणिक सहाय्य योजना** | | | |
| १ | E०१ | इयत्ता १ ली ते ७ वी साठी प्रतिवर्षी रु.२५००/- आणि इयत्ता ८ वी ते १० वी साठी प्रतिवर्षी रु. ५०००/- एवढे शैक्षणिक आर्थिक सहाय्य. | ५५३६.७ | ७०७५.८७ | ८०००.०० |
| २ | E०२ | इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मध्ये किमान ५०% किंवा अधिक गुण प्राप्त झाल्यास रु. १०,०००/- एवढे प्रोत्साहानात्मक शैक्षणिक सहाय्य. | २३४३.८ | २५८९.०० | ३०००.०० |
| ३ | E०३ | इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या शिक्षणासाठी प्रती शैक्षणिक वर्षी रु. १०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य. | ५५७२.०० | ६८७५.९० | ७६००.०० |
| ४ | E०४ | प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेश, पुस्तके व शैक्षणिक सामुग्रीसाठी प्रतिवर्षी रु २०,०००/- एवढे शैक्षणिक सहाय्य. | ९६३९.६ | १२०२९.४० | १३५००.०० |
| ५ | E०५ | वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.१,००,०००/- व अभियंत्रिकी पदवी अभ्यासक्रमाकरीता रू.६०,०००/- इतके शैक्षणिक सहाय्य. | १६८६७ | २४३८८.०० | २७०००.०० |
| ६ | E०६ | पदविका शिक्षणकरिता प्रती शैक्षणिक वर्षी रू.२०,००० आणि पदव्युत्तर पदवीका शिक्षणकरिता मप्रति शैक्षणिक वर्षी रु. २५,०००/- इतके शैक्षणिक सहाय्य. | ४९८८.७५ | ६३६३.५० | ७०००.०० |
| ७ | E०७ | संगणकाचे शिक्षण (MS-CIT) घेत असलेल्या नोंदीत लाभार्थी कामगारांच्या दोन पाल्यांना शुल्काची परीपुर्ती. | १३२.७७ | १९१.४७ | २५०.०० |
| | H | **आरोग्य सहाय्य योजना** | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | H०१ | नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगारास नैसर्गिक प्रसुतीसाठी रु.१५,०००/- व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी रु. २०,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | १५२३.३५ | ११३२.२० | १३००.०० |
| ९ | H०२ | लाभार्थी कामगार व त्याच्या कुटूंबियांना गंभीर आजाराच्या उपचारार्थ रु.१,००,०००/- एवढे वैद्यकीय सहाय्य. | २७५.४९ | ३१४.५९ | ३५०.०० |
| १० | H०३ | नोंदीत लाभार्थी कामगार अथवा त्याच्या पती/ पत्नीने एका मुलीच्या जन्मानंतर कुटूंब नियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास त्या मुलीच्या नावे मुलीच्या नावे १८ वर्षापर्यंत रू.१,००,०००/- मुदत ठेव. | १.०० | ०.०० | १.०० |
| ११ | H०४ | नोंदित लाभार्थी कामगारास ७५% किंवा कायमचे अपंगत्व आल्यास त्यास रु.२,००,०००/-एवढे आर्थिक सहाय्य. | १६०.०० | ३५३.०० | ४००.०० |
| १२ | H०५ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करणेबाबत | ०.०० | ०.०० | १.०० |
| १३ | H०६ | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांकरीता व्यसनमुक्ती केंद्रांतर्गत उपचाराकरीता नोंदीत बांधकाम कामगारास रू.६०००/- इतके अर्थसहाय्य. | ०.०० | ०.०० | १.०० |
| १४ | H०७ | नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांचा अपघातात हात किंवा पाय निकामी झाल्यास कृत्रिम अंग जोडण्यासाठी अर्थसहाय्य देणे. | ०.०० | ०.०० | १.०० |
| | **F** | **आर्थिक सहाय्य योजना** | | | |
| १५ | F०१ | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराचा कामावर असताना मृत्यु झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास रु. ५,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | ९०.०० | १०५.०० | १२०.०० |
| १६ | F०२ | नोंदीत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास रू.२ लाख आर्थिक सहाय्य देणेबाबत. | २१२४.०० | ३६९२.०० | ५०००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | F०३ | नोंदीत बांधकाम कामागारांच्या घर खरेदी किंवा घर बांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रू.६.०० लक्ष पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रू.२.०० लक्ष मंडळामार्फत देणेबाबत | ८.६३ | ८.०० | १०.०० |
| १८ | F०४ | अटल बांधकाम कामगार आवास योजनेत (शहरी) पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत रु.२ लक्ष अनुदान देणे प्रस्तावित आहे. | ९२६.०० | १८०६.०० | ३०००.०० |
| १९ | F०५ | अटल बांधकाम कामगार आवास योजनेत (ग्रामीण) आवास योजनेत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना मंडळामार्फत रु.२ लक्ष अनुदान देणे प्रस्तावित आहे. | ४३०.५० | ४३४.२० | १०००.०० |
| २० | F०६ | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या नामनिर्देशित केलेल्या वारसास रु. १०,०००/- एवढी रक्कम अंत्यविधीसाठी मदत. | १७९.०० | १६३.९० | ७५०.०० |
| २१ | F०७ | नोंदित लाभार्थी कामगाराचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नी अथवा स्त्री कामगाराचे विधुर पतीस प्रतीवर्षी रु. २४,०००/- एवढे आर्थिक सहाय्य. | ५६९.७६ | ४५९.६० | ७५०.०० |
| २२ | F०८ | अपघाती नैसर्गिक मृत्यू झालेल्या नोंदित बांधकाम कामगार लाभार्थ्यांचे शव शववाहिनीद्वारे मूळ गावी पाठविण्यासाठी एस. टी. महामंडळाच्या आगार प्रमुखाने प्रति किलोमीटर अंतरासाठी प्रमाणित केलेल्या दराप्रमाणे अर्थसहाय्य देणे. | ०.०७ | ०.०० | १.०० |
| | S | **सामाजिक सहाय्य योजना** | | | |
| २३ | S०१ | नोंदित लाभार्थी बांधकाम कामगाराच्या स्वत:च्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी रु. ३०,०००/- अर्थसहाय्य. | २२५४.२० | १६३९.१ | ३३००.०० |
| २४ | S०२ | बांधकाम कामगारांसाठी जेवण किंवा पोषण आहार यांचा पुरवठा करणे. | २०५७८४.१९ | ०.०० | १.०० |
| २५ | S०४ | नोंदीत पात्र बांधकाम कामगारांना बांधकामासाठी उपयुक्त/ आवश्यक असलेली अवजारे खरेदी करण्याकरीता | २.५० | १.०० | १.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रतिकुटुंब रू. ५०००/- अर्थसहाय्य देणेबाबत. | | | |
| २६ | S०५ | जिवित नोंदित बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना लागु करणेबाबत. | ०.११ | ०.०५ | ०.०५ |
| २७ | S०६ | जिवित नोंदित बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना लागु करणेबाबत. | ०.००३ | ०.००१३ | १.०० |
| २८ | S०७ | जिवीत नोंदीत बांधकाम कामगारांना पूर्व शिक्षण (RPL) ओळख योजना लागू करणे. | ०.०० | ०.०० | ६००००.०० |
| २९ | S०८ | नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षेसाठी सुरक्षा संच (Safety Kit) पुरविणेबाबत | ५३५४०.५६ | ४१७२०.१७ | ७५०००.०० |
| ३० | S०९ | नोंदीत बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच (Essential Kit) पुरविणेबाबत | ५१७२२.५६ | ४२१६५.०९ | ७५०००.०० |
| ३१ | S१० | नोंदणी अभियान, लाभवाटप कार्यक्रम व योजनेची प्रसार व प्रसिध्दी | १०४०६.९३ | १९५५७.०३ | ५०००.०० |
| | | मंडळाकडील विविध कल्याणकारी योजनांची सर्वसमावेशक माहिती पुस्तिका छपाई | २९३८.२० | ३९३८.१९ | १.०० |
| | | एकुण | १३३४५.१३ | २३४९५.२२ | ५००१.०० |
| ३२ | S११ | बांधकाम ठिकाणी नोंदित बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी ते उपचार योजना | ५८५००.६६ | १२९२६९.६५ | १३००००.०० |
| ३३ | S१२ | कामगार कल्याण मंडळाचे उपक्रम व कार्यक्रमाचा लाभ बांधकाम कामगारांना देणे. | ०.०० | ०.०० | १.०० |
| ३४ | S१३ | नोंदित बांधकाम कामगारांच्या एका मुलीच्या विवाहाकरिता रू. ५१०००/- एवढे अर्थसहाय्य देणे. | ४१५४.९७ | ४४३९.०८ | १०२००.०० |
| ३५ | S१४ | गृहपयोगी वस्तु संच वाटप | २२९७३.४२ | १८७५९०.२७ | २०००००.०० |
| ३६ | S१५ | इमारत बांधकाम कामगारांसाठी शेड (कामगार नाका) बांधणे | १.१८ | १.७७ | ५०००.०० |
| ३७ | S१६ | जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणे (DBWFC) | २९०१.५६ | ४८४९.७२ | ५१७०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३८ | S१७ | तालुका इमारत कामगार सुविधा केंद्र (TBWFC) स्थापन करणे | ०.०० | ११०९७.३४ | १२५००.०० |
| ३९ | S१८ | मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता हेल्पलाईन सेवा कार्यान्वित करणे. | ०.०० | ०.०० | ६००.०० |
| **अ.** | **विविध कल्याणकारी योजनांवरील अपेक्षित खर्च** | | **४६६५४९.४६** | **५१४२५०.०९** | **६६०८१०.०५** |

| **अ. क्र.** | **लेखाशीर्ष क्र. व योजनेचे नाव** | **सन २०२५-२६ मुळ अंदाज** |
|---|---|---|
| १ | P०१ बांधकाम कामगारांसाठी निवृत्ती वेतन योजना | १०००.०० |
| **प्रस्तावित योजनावरील अपेक्षित खर्च** | | **१०००.००** |
| **विविध कल्याणकारी योजनांवरील अपेक्षित एकूण खर्च (अ+ब)** | | **६६१८१०.०५** |

**७. मंडळाचा प्रशासकीय बाबींवरील खर्च**

अ. **प्रशासकीय बाबीवरील खर्च :** मंडळामार्फत करण्यात येत असलेल्या प्रशासकीय खर्चामध्ये एकात्मिक कल्याणकारी मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS), जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेवरील खर्च (WFC), बाहय यंत्रणेद्वारे नियुक्त कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते, प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांचे वेतन, भत्ते प्रवास खर्च, मंडळाच्या बैठकांचा खर्च, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (CAG) यांचे लेखापरीक्षण फी, कार्यालयीन भाडे, मंडळावर नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्थांचे सल्लागार शुल्क, दूरध्वनी खर्च, भाडयाच्या वाहनावरील खर्च व अन्य प्रशासकीय खर्चाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे.

ब. **इतर बाबीवरील खर्च :** उपकर जमा करणा-या प्राधिकरणांना उपकर जमा करण्यासाठी देय १% प्रशासकीय खर्चाची तरतूद, नजर चुकीने/ अनावधानाने मंडळाच्या खाती जमा रक्कमांच्या परताव्याच्या रक्कमाकरिता तरतूद, लॉकर खर्च, बॅंक शुल्क इत्यादी खर्चाची तरतूद करण्यात आलेली आहे.

➢ मंडळाचे मुख्यालय व जिल्हा कार्यालयातील बाब निहाय प्रशासकीय खर्चाचे अंदाज

(रूपये लाखात)

| अनु. क्र. | खर्चाची बाब | सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष खर्च | सन २०२४-२५ मधील सुधारित अंदाज | सन २०२५-२६ मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|
| A०१ | वेतन व भत्ते | ९८.०९ | ९४.५९ | १०५.०० |
| A०२ | मजुरी व कार्यालयीन स्वच्छता | २८.३१ | १९.९८ | २२.०० |
| A०६ | कार्यालयीन दूरध्वनी, इंटरनेट चार्जेस, मोबाईल व वीज देयके | ४०.९५ | ५२.९८ | ६०.०० |
| A१० | बाहय यंत्रणेद्वारे कंत्राटी कर्मचारी, सुरक्षा रक्षकांचे वेतन व सेवा निवृत्ती अधिका-यांचे पारिश्रमिकावरील खर्च | १२४४.२५ | १६७१.०६ | १८४०.०० |
| A११ | प्रवास खर्च | १.५२ | १.५३ | १.७५ |
| A१३ | कार्यालयीन स्टेशनरी व छपाई | ८०.२६ | ७१.७० | ८०.०० |
| A१४ | मुख्यालय व जिल्हा कामगार सुविधा केंद्राचे भाडे, पट्टी व कर | ७५९.६१ | ७१८.९८ | ८००.०० |
| A१७ | संगणक व इतर यंत्रसामुग्री खरेदी व देखभाल दुरूस्ती | २२.६९ | २२.१० | २५.०० |
| A१९ | मंडळ सदस्यांचे मानधन, मंडळ बैठका व अन्य बैठकांचा खर्च | ०.३९ | ०.१० | ०.११ |
| A२४ | पेट्रोल, तेल व वंगण खर्च | १५.३५ | ८.०५ | ९.०० |
| A२८ | सल्लागारांचे व्यावसायिक शुल्क | १८३.०९ | ३२४.३४ | ३६०.०० |
| A३३ | पोस्टल स्टॅम्प / तिकीट | २.८५ | ३.२३ | ३.५० |
| A३४ | मुख्यालय व क्षेत्रिय कार्यालयचे वाहन भाडे खर्च | २९७.४९ | २३३.१९ | २५०.०० |
| A२६ | मंडळाच्या निविदा सुचनांच्या जाहिरातीवरील खर्च | ४.५१ | १.७५ | २.०० |
| A३० | मा. महालेखापाल व सनदी लेखापरिक्षण शुल्क | ४.६५ | ४.१५ | १०.०० |
| | विधी सल्लागार फी | ४.११ | १.९३ | २०.०० |
| A५० | इतर खर्च | १.८४ | ४.४४ | ५.०० |
| | बँक शुल्क व लॉकर खर्च | १.२६ | ०.०२ | ०.०२ |
| | कॉम्पक्टर खरेदी | २७७३५.८६ | ४७७३.११ | ७०००.०० |
| | डॅश बोर्ड विकसित करणे | १२१.८२ | ०.०० | ०.०० |
| | सेस कलेक्टिंग एजन्सी | १४९०.२७ | १३३३.७१ | ४५२.७० |
| | **प्रशासकीय खर्च एकूण** | **३४९८४.३६** | **११०४६.०८** | **११०४६.०८** |

## क) अधिनियमातील तरतूदीनुसार उपकर परतावा

(रूपये लाखात)

| अ. क्र. | खर्चाची बाब | सन २०२३-२४ मधील प्रत्यक्ष खर्च | सन २०२४-२५ मधील सुधारित अंदाज | सन २०२५-२६ मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|
| C०१ | उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद . | ६.८४ | ५.९६ | ६.०० |
| C०२. | चुकीने/अनावधानाने मंडळाच्या खाती जमा, उपकराच्या सुधारित परिगणनेनुसार करावयाचा परतावा. | ९१२.५२ | ४०५.२० | १००.०० |
| | **एकूण उपकर परतावा (क)** | **९१९.३६** | **४११.१६** | **१०६.००** |

**मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना व प्रशासकीय बाबींवरील मागील तीन वर्षातील प्रत्यक्ष खर्च, सन २०२४-२५ चे सुधारित अंदाज व सन २०२५-२६ या वर्षाच्या मूळ अंदाजित खर्चाचा तपशील**

(रूपये लाखात)

| खर्चाचा तपशिल | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ (मूळ अंदाज) | २०२४-२५ (सुधारीत अंदाज) | २०२५-२६ मूळ अंदाज) |
|---|---|---|---|---|---|
| विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | ३९२४०६.७२ | ४६६४४८.५१ | ४३१५५६.०५ | ५१४२५०.०९ | ६६०८१०.०५ |
| प्रस्तावित योजना | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | १०००.०० |
| प्रशासकीय खर्च | ६३०३.१५ | ५६२०.०४ | ६१८०.५० | ३२२१.८३ | ३५५६.३६ |
| इतर खर्च- प्रशासकिय खर्च | २३.५३ | २९३६४.३२ | ८७३७.४६ | ६११९.१९ | ७४८९.७२ |
| उपकर परतावा | ३९.७१ | ९१२.५२ | ५००.०० | ४०५.२० | १००.०० |
| कल्याणकारी योजनावरील खर्चाशी प्रशासकीय खर्चाची टक्केवारी (%) | १.५८ | ६.८४ | ३०.०० | ५.९६ | ६.०० |
| **एकूण** | **३९८७७४.६९** | **५०२३५२.२३** | **४४७००४.०१** | **५२४००२.२७** | **६७२९६२.१३** |

## सन २०२५-२६ मधील अपेक्षित जमा व खर्चाचा गोषवारा

(रूपये लाखात)

| अ.क्र | बाब (जमा) | अपेक्षित जमा | बाब (खर्च) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | उपकर | ६०००००.०० | विविध कल्याणकारी योजनांवरील खर्च | ६६०८१०.०५ |
| २ | बँकेतील मुदतठेवीवरील व्याज | ७०८७८.९० | प्रस्तावित योजना | १०००.०० |
| ३ | नोंदणी फी | ३०.०० | प्रशासकिय खर्च | ३५५६.३६ |
| ४ | मासिक वर्गणी | १५.०० | नजर चुकीने/ अनावधानाने जमा रक्कमेचा परतावा | ६.०० |
| ५ | इतर जमा | ०.०१ | उपकर जमा रक्कमेपोटी देय प्रशासकीय खर्चाची (१%) तरतूद | १००.०० |
| | एकूण जमा | ६७०९२३.९१ | एकूण खर्च | ६६५४७२.४१ |

+5551

लेखा अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई